# प्रकरण पहिले

# प्रस्तावना

# प्रकरण पहिले

| | |
|---|---|
| १.१ | भाषेची गरज |
| १.२ | भाषा अध्ययनाचे स्वरूप |
| १.३ | भाषा : ज्ञान संपादनाचे व अभिव्यक्तीचे साधन |
| १.४.१ | प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम १९८८ |
| १.४.२ | क्षमताधिष्ठित अभ्यासक्रम १९९५ |
| १.४.३ | मातृभाषा : क्षमताधिष्ठित अभ्यासक्रमाची मांडणी व उद्दिष्टे |
| १.५.१ | पालकांचा मातृभाषेकडे पाहण्याचा दृष्टीकोन |
| १.५.२ | मातृभाषा अध्यापनाबाबत शिक्षकांचा दृष्टीकोन |
| १.६.१ | मातृभाषा : क्षमताधिष्ठित मूल्यमापनाची गरज |
| १.६.२ | मातृभाषा : क्षमताधिष्ठित मूल्यमापनाचे स्वरूप |
| १.७ | संशोधनाची गरज |
| १.८ | समस्या विधान, संशोधनाची उद्दिष्टे, परिकल्पना, व्याप्ती, मर्यादा, संज्ञांची परिभाषा, प्रकरण योजना |

# प्रकरण - १

# प्रस्तावना

## १.१ भाषेची गरज

मानवी जीवनात भाषेला अनन्यसाधारण स्थान आहे. जेव्हा माणसाला भाषा अवगत नव्हती तेव्हा आपल्या मनातील विचार, कल्पना, विविध प्रकारच्या कृती, हावभाव, चेहऱ्यावरील हावभाव इत्यादीद्वारे व्यक्त करत होता. विसाव्या शतकातील पूर्वार्धातील काही मूक चित्रपट पाहताना केवळ अभिनय, कृती, हावभाव यावरूनच संबंधित पात्रांच्या मनातील भावना जाणून घ्याव्या लागत होत्या. परंतु काही बाबी, विशेषत: विचार असे असतात की, ते कृती, हावभाव, अभिनय याद्वारे दाखविताच येत नाहीत. दैनंदिन व्यवहारामध्ये भाषेचा वापर न करताच काम करावयाचे म्हटले, काम करताना दुसऱ्याला काही सांगावयाचे म्हटले तर स्पष्टपणे दुसऱ्याला समजेल असे आपण काही करू शकत नाही वा सांगू शकत नाही. म्हणूनच आपल्या मनातील विचार चटकन व सहजपणे दुसऱ्याला समजावेत, परस्परांशी नित्य संपर्क साधता यावा यासाठी मानवाला भाषेची गरज निर्माण झाली.

## १.२ भाषा अध्ययनाचे स्वरूप

गरजेतून भाषेची निर्मिती झाली. माणूस बोलू लागला म्हणजेच भाषा शिकला. खऱ्या अर्थाने कुटुंबातच मुलाची भाषा शिकण्याची प्रक्रिया सुरू होते. कुटुंबामध्ये आई, वडील, कुटुंबातील अन्य व्यक्ती, शेजारी, मित्रपरिवार, इ. कडून मूल भाषा शिकते. भाषेमुळे माणसाच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास होतो. वास्तविक भाषा ही एक सामाजिक संस्था आहे. समाजाला ज्याप्रमाणे परंपरा असतात, प्रतिष्ठास्थाने असतात, इतिहास असतो त्याप्रमाणे भाषेच्या बाबतीतही असते. जिवंत समाज परिवर्तनशील असतो, तशी भाषाही परिवर्तनशील असते. समाजाच्या आशा आकांक्षानुसार बदलत्या गरजानुसार नवनव्या आव्हानानुसार भाषा बदलते. भाषेमध्ये चैतन्याचा प्रवाह वाहत असतो.

म्हणूनच भाषेमुळे विचारशक्ती विकसित होत जाते. जीवनदृष्टी चिकित्सक बनू लागते. भाषेच्या अध्ययनामुळे सामाजिक जाणीव जोपासली जाते. तसेच सर्वधर्मसमभाव, राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रीय चारित्र्य, राष्ट्रप्रेम, जीवनमूल्याविषयीचे प्रेम इ. जीवन उन्नत करणाऱ्या गुणांची जोपासना केली जाते.

## १.३ भाषा : ज्ञानसंपादनाचे व अभिव्यक्तीचे साधन

भाषा हे ज्ञानसंपादनाचे प्रमुख साधन आहे. जेव्हा लेखनकलेचा शोध लागलेला नव्हता तेव्हा माणसाला ज्ञान मुखोद्‌गत करावे लागत होते व ते पुढील पिढीला दिले जात होते. पिढ्यान् पिढ्या संपादित केलेले विविध विषयाचे ज्ञान माणूस अशा प्रकारे जतन करीत असे. ज्ञानग्रहण, ज्ञानसंवर्धन, ज्ञानप्रसार इ. कार्ये भाषेमुळेच शक्य होतात.

माणसाला लहानपणापासून अनेकविध प्रकारचे अनुभव येत असतात. हे अनुभव जसजसे संपन्न होत जातात तसतशी भाषाभिव्यक्तीची शक्ती वृद्धींगत होत जाते. ही अभिव्यक्ती माणसाच्या लेखनातून जशी प्रकट होते तशी ती बोलण्यातूनही प्रकट होते. लेखनातून प्रकट होणारी अभिव्यक्ती ही अप्रत्यक्ष स्वरूपाची असते तर बोलण्यातून प्रकट होणारी अभिव्यक्ती ही प्रत्यक्ष स्वरूपाची असते. कृती, लेखन यापेक्षा बोलण्यातून प्रकट होणारी अभिव्यक्ती अधिक प्रमाणात असते. कारण ही अभिव्यक्ती सहजपणे कोणत्याही बाह्य साधनाविना होत असते. मूल शाळेत जाण्या अगोदरच ऐकण्याचा, बोलण्याचा प्रयत्न करीत असते. मुलाला बोलता येण्यापूर्वी त्याची अभिव्यक्ती कृतीतून होत असते. नंतर शाळेत जाईपर्यंत त्याची अभिव्यक्ती बोलण्यातून प्रकट होते. जेव्हा मूल शाळेत जाऊ लागते तेव्हा जाणीवपूर्वक कसे ऐकावे, कसे बोलावे, वाचन, लेखन यासारख्या मूलभूत बाबी शिकण्याचा प्रयत्न करते. या बाबी अधिक विकसित व्हाव्यात म्हणून अभ्यासक्रमात जाणीवपूर्वक लक्ष दिले आहे.

## १.४.१ मातृभाषा : प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम – १९८८

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणामुळे मुले मोठ्या संख्येने शाळेत येऊ लागली. परंतु ती शिकली का या पार्श्वभूमीवर विचार करता राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार १९८८ चा अभ्यासक्रम

बालकेंद्रित, उपक्रमशील व आनंददायी अध्ययन अध्यापन प्रक्रियेस महत्व असलेला होता असे म्हणावे लागते.

श्रवण, भाषण-संभाषण, वाचन, लेखन ही भाषेची चार मूलभूत कौशल्ये आहेत. विद्यार्थ्यांनी ती आत्मसात करावी असे अपेक्षित आहे. शब्द, शब्दांचे अर्थ, वाक्यरचना, वाक्यरचनेद्वारा व्यक्त होणारे अर्थ आकलन, भाषेतील शब्द आणि वाक्य यांचा योग्य उपयोग करण्याची क्षमता निर्माण होणे यांचा समावेश मातृभाषेच्या अभ्यासात होतो. हे लक्षात घेऊन मातृभाषेचा अभ्यासक्रम तयार केला गेला.

### १.४.२ मातृभाषा : क्षमताधिष्ठित अभ्यासक्रम – १९९५

शाळेत जाण्या योग्य वयोगटातील मुले मुली शाळेत आली पाहिजेत, टिकली पाहिजेत, शिकली पाहिजेत. परंतु ती शाळेत टिकून राहण्याचे व शिकण्याचे प्रमाण अपेक्षेपेक्षा कमी राहिले. मूल चार-चार वर्षे शाळेत जाऊनही ते लिहिण्या-वाचण्यातही कमी पडते, मिळवलेल्या ज्ञानाचा उपयोग त्याला व्यवहारात करता येत नाही. अशा प्रतिक्रिया समाजाकडून येऊ लागल्या. या पार्श्वभूमीवर प्रत्येक विद्यार्थ्याने इयत्तेनुसार शिक्षण घेतल्यानंतर वर्षअखेरीस टिकाऊ आणि व्यवहारात उपयोगी पडू शकेल असे ज्ञान त्याला मिळालेच पाहिजे असा विचार पुढे आला. त्यातूनच क्षमताधिष्ठित अध्ययन-अध्यापनाची संकल्पना पुढे आली. शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्याचा एक प्रयत्न म्हणून क्षमताधिष्ठित प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम तयार करण्यात आला. या अभ्यासक्रमात इयत्ता १ ते ५ साठी मातृभाषा व गणित व इयत्ता ३ ते ५ साठी सामान्यविज्ञान या विषयाचा अंतर्भाव केला. दर्जेदार शिक्षणाचा लाभ वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना मिळावा हा क्षमताधिष्ठित अभ्यासक्रमाचा मुख्य हेतू आहे. 'वर्गातील सर्व विद्यार्थ्यांनी शिकायला हवे आणि तेही चांगले शिकायला हवे' हे सूत्र क्षमताधिष्ठित अभ्यासक्रमाच्या केंद्रस्थानी आहे. प्रत्येक मुलाला मातृभाषेतील मूलभूत कौशल्ये आत्मसात झाली पाहिजेत. या दृष्टीने मातृभाषा अभ्यासक्रमाची रचना झाली.

**१.४.३.४ मातृभाषा : क्षमताधिष्ठित अभ्यासक्रमाची मांडणी व उद्दिष्टे**

मातृभाषेच्या क्षमताधिष्ठित अभ्यासक्रमाची मांडणी पुढील चार स्तंभात केली आहे.

**१) क्षेत्र** - या रकान्यात प्रत्येक विषयातील क्षमतांचे आशयानुसार गट पाडलेअसून प्रत्येक गटाला संदर्भासाठी क्षेत्र म्हटले आहे. भाषा विषयासाठी श्रवण, भाषण, वाचन, लेखन, आकलन, कार्यात्मक व्याकरण, भाषेचा व्यवहारात उपयोग, स्वयंअध्ययन, शब्दसंपत्तीवर प्रभुत्व अशी नऊ क्षेत्रे आहेत.

**२) अध्ययन क्षमता** - या रकान्यात क्षमतांची काठिण्यपातळीनुसार चढत्या क्रमाने मांडणी केली आहे. प्रत्येक क्षमतेला संदर्भाच्या सोयीकरिता क्रमांक दिलेला आहे. भाषा विषयासाठी १९ क्षमता आहेत. उदा. १.४.१ म्हणजे पहिला अंक क्षेत्र क्रमांक, दुसरा अंक इयत्ता व तिसरा अंक क्षेत्रांतर्गत क्षमता दर्शवितो.

**३) घटक / व्याप्ती** - या रकान्यात प्रत्येक क्षमतेची व्याप्ती नमूद केली आहे. तसेच क्षमतेशी संबंधित आशय मुद्यांच्या स्वरूपात दिला आहे.

**४) अध्ययन – अनुभव / उपक्रम** - प्रत्येक क्षमता विकसित होण्यासाठी कृतियुक्त व रंजक अध्ययन - अनुभवांची यादी अभ्यासक्रमात दिलेली आहे.

वरील नऊ क्षेत्रांपैकी श्रवण, भाषण - संभाषण, वाचन, लेखन ही चार मूलभूत भाषिक कौशल्ये आहेत. त्यावर विद्यार्थ्यांना प्रभुत्व मिळावे यासाठी आवश्यक पुरेशा व सातत्यपूर्ण सरावाची गरज आहे. शिक्षकांनी स्वत:ची कल्पकता व योजकता वापरून अभ्यासक्रमात दिलेल्या उपक्रमात भर घालावी अशी अपेक्षा आहे. वरील चार मूलभूत कौशल्ये म्हणजे क्षेत्रे व त्याअंतर्गत क्षमतांच्या विकासासाठी सरावाची अधिकाधिक संधी मुलांना उपलब्ध करून द्यावी, विद्यार्थ्यांनी क्षमतांचे संपादन प्रभुत्व पातळीपर्यंत करण्यासाठी शिक्षकांनी आपल्या मार्गदर्शनासाठी स्वयंअध्ययन उपक्रम द्यावेत अशी अपेक्षा आहे.

मुलाने शाळेत प्रवेश घेतल्यानंतर बोलीभाषेकडून प्रमाणभाषेकडे त्याची वाटचाल सुरू होते. वास्तविक त्याला प्रमाणभाषेकडे आणण्याचे काम शिक्षकाला जाणीवपूर्वक करावे लागते. भाषेचे अध्यापन करताना ते क्षमताधिष्ठित असणे आवश्यक आहे. मुलांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित असे आवडीचे विषय घेऊन जर अध्यापन केले तर मुले सहजपणे प्रमाणभाषा शिकतात. भाषेचे अध्यापन करत असताना १९८८ च्या अभ्यासक्रमातील मातृभाषा पाठ्यक्रमाची

१) मातृभाषेतून स्वत:चे विचार प्रकट करता येणे.

२) श्रवण, वाचन, लेखन ही भाषिक कौशल्ये आत्मसात करण्यास मदत करणे.

३) संभाषण करता येणे.

४) परिसराच्या माध्यमातून स्वत:चे अनुभव प्रकट करता येणे.

ही उद्दिष्टे व ती साध्य करण्यासाठी प्रत्येक क्षमतानिहाय दिलेले उपक्रम लक्षात घ्यावे लागतात. त्याबरोबरच पुढील सामान्य उद्दिष्टेही विचारात घ्यावी लागतात.

१) विद्यार्थ्याने लक्षपूर्वक श्रवण करणे व जे श्रवण केले त्याचे योग्य आकलन होणे.

२) आपले विचार, भावना, कल्पना व इच्छा स्पष्ट आणि समर्पक शब्दातून वाचेने व्यक्त करता येणे. (प्रसंगानुरूप योग्य भाषेचा वापर करता येणे.)

३) योग्य उच्चार, योग्य स्वराघात, आशयानुरूप आवाजातील चढउतार, योग्य गती यांची जाण ठेवून विद्यार्थ्याला बोलता येणे.

४) योग्य स्वराघात, योग्य उच्चार आणि योग्य अभिव्यक्ती यांचा मेळ साधून अस्सखलितपणे प्रकट वाचन करता येणे.

५) योग्य रीतीने मूकवाचन करता येणे व जे वाचले त्याचे नीट आकलन होणे.

६) सुवाच्च्य व वळणदार अक्षरात लिहिता येणे.

७) आपले विचार, अनुभव, भावना, कल्पना इ. परिणामकारकपणे व्यक्त करण्यासाठी आवश्यक ते लेखन कौशल्य प्राप्त होणे.

८) विराम चिन्हांचा वापर करून व लेखनाच्या नियमानुसार नीटनेटके लेखन करता येणे.

९) भाषेची जडणघडण समजणे.

१०) विविध साहित्य प्रकारांचा आस्वाद घेण्याची क्षमता निर्माण होणे.

११) रंगभूमी, चित्रपट, आकाशवाणी, दूरदर्शन आणि नियतकालिके या माध्यमाद्वारे भाषिक क्षमता समृद्ध होणे

वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी नऊ क्षेत्रे व त्याअंतर्गत १९ क्षमता निश्चित केलेल्या आहेत. या क्षमतांचा विकास करणे म्हणजे भाषेचे अध्ययन व अध्यापन. यासाठी पाठ्यपुस्तक हे एक साधन आहे. वास्तविक मुलाच्या घरातील भाषाविषयक वातावरण, घराभोवतीचा परिसर, शालेय परिसर हे घटक भाषा अध्ययन व अध्यापनाच्या दृष्टीने महत्वाच्या आहेत. भाषेच्या क्षमताधिष्ठित अध्यापनात भाषेच्या नऊ क्षेत्रामध्ये भाषा विकास करण्यासाठी अभ्यासक्रमात दिलेल्या विविध उपक्रमांचा उपयोग होणे आवश्यक असते. या उपक्रमांचे आयोजन शिक्षकच करतात. परंतु १९९५ च्या प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रमामध्ये दिलेल्या उपक्रमाव्यतिरिक्त विशिष्ट क्षमता विद्यार्थ्यांच्या ठिकाणी विकसित होण्यासाठी अन्य उपक्रमांचे आयोजनही शिक्षकाने करावे असे अपेक्षिलेले आहे. क्षमता विकसनासाठी असलेले हे उपक्रम मौखिक, लेखी किंवा प्रात्यक्षिक स्वरूपाचे असतात. त्यासाठी शिक्षकांनी आवश्यक ते मार्गदर्शन, सराव द्यावयाचा असतो. शिक्षकांनी सर्व उपक्रम सर्व विद्यार्थ्यांकडून व्यक्तिश: लक्ष देऊन करवून घ्यावयाचे असतात. अर्थात यासाठी पालकांचे सहकार्यही तितकेच महत्वाचे असते.

### १.५.१ पालकांचा मातृभाषेकडे पाहण्याचा दृष्टीकोन

मूल शाळेत प्रवेश करण्याअगोदरच काही प्रमाणात त्याला भाषा अवगत झालेली असते. ज्या भाषेतून मूल व्यवहार करते म्हणजे बोलते, ती भाषा त्याची बोलीभाषा असते. मूल घरात आई-वडील, नातेवाईक, शेजारी मित्र इ. शी बोलत असते. म्हणजे मुलाला भाषा ऐकता व बोलता येते. चार मूलभूत कौशल्यांपैकी श्रवण व भाषण-संभाषण ही कौशल्ये त्याने काही प्रमाणात आत्मसात केलेली असतात. वयाची ५ किंवा ६ वर्षे पूर्ण झाल्यानंतर मूल शाळेत प्रवेश करते. तेव्हा त्याची बोलीभाषा प्रमाणभाषा असेलच असे नाही. इ. १ ली मध्ये भाषा व गणित या दोन विषयाचे प्रामुख्याने अध्यापन केले जाते. परंतु भाषा हा अभ्यासाचा विषय नव्हे. फक्त मुलाला वाचन, लेखन करता आले म्हणजे भाषा विषय मुलाला अवगत झाला असे पालकांना वाटते. त्यामुळे इ. १० वी मध्ये जाईपर्यंत पालकांना मातृभाषा अभ्यासाचे महत्व वाटत नाही. विशेषत: सुशिक्षित पालकांनासुद्धा मातृभाषा अभ्यासाचे महत्व वाटत नाही.

### १.५.२ मातृभाषा अध्यापनाबाबत शिक्षकांचा दृष्टीकोन

अपेक्षित भाषिक क्षमता विकसित करण्यासाठी इ. १ ते ४ साठी मातृभाषा विषयासाठी आठवड्याला १३ तासिका आहेत. या तासिका अध्यापन व मूल्यमापनासाठी आहेत. घटकाच्या काठिण्यपातळीनुसार या तासिका विभागलेल्या असतात. प्रत्यक्ष अध्यापन नियोजनात मात्र सुसूत्रता दिसून येत नाही. मुलत: मातृभाषा अध्यापनाबाबत प्रत्येक शिक्षकांचा दृष्टीकोन वेगळा दिसून येतो. मातृभाषेचे अध्यापन करणे, पाठ वाचणे, कठीण शब्दांचे अर्थ सांगणे व लिहून देणे, पाठाखाली असलेल्या प्रश्नांची उत्तरे पाठ करवून घेणे एवढा सीमित अर्थ घेतला जातो. मातृभाषा अध्यापनाविषयी शिक्षकांचा दृष्टीकोन नीरस आहे. जी भाषा मुले कुटुंबात बोलतात त्या भाषेचे त्यांना ज्ञान असते असे गृहीत धरुनच अध्यापन केले जाते. त्यामुळे अनेकदा असे आढळते की मातृभाषेच्या तासिका इतर विषयांसाठी वापरल्या जातात. वास्तविक इतर विषयांचे अध्ययन अध्यापन हे भाषेच्या अध्ययन अध्यापनावर

अवलंबून असते. मातृभाषेच्या व्याकरणाकडे तर शिक्षकांचे पूर्ण दुर्लक्ष होते. परंतु क्षमताधिष्ठित अभ्यासक्रमामुळे बराचसा बदल झालेला दिसून येतो. मातृभाषेच्या ज्या पाठाचे अध्यापन करावयाचे त्या पाठातून नेमक्या कोणत्या क्षमता विकसित करावयाच्या आहेत याची नोंद पाठ टाचणात घेतली जाते व त्यादृष्टीने शिक्षक प्रयत्न करतात. विशेषत: वाचन, लेखन, आकलन, कार्यात्मक व्याकरण, स्वयंअध्ययन, भाषेचा व्यवहारात उपयोग, शब्द संपत्तीवर प्रभुत्व या क्षेत्रांतर्गत क्षमतांच्या विकासाकडे शिक्षक जाणीवपूर्वक लक्ष देतात. प्रयत्नही करतात. श्रवण, भाषण-संभाषण या क्षेत्रांतर्गत क्षमतांच्या विकासाकडे लक्ष दिले जाते. परंतु त्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन केले जातेच असे नाही. मुलत: अध्यापन ही द्विकेंद्री प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत एका बाजूने विशिष्ट हेतूने विद्यार्थ्याला नवी माहिती देणे, शिकण्याची प्रेरणा देणे व विद्यार्थ्यांमध्ये नवीन कौशल्ये विकसित करणे या बाबींचा समावेश होतो. विद्यार्थ्यांचे अध्ययन घडले तर अध्यापन झाले असे म्हणता येते. विद्यार्थ्यांचे अध्ययन घडणे म्हणजे क्षमतांचा विकास होणे. सर्व विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमात निर्धारित केलेल्या सर्व क्षमतांवर प्रभुत्व मिळवावे हे उद्दिष्ट आहे. परंतु टप्प्याटप्प्याने का होईना पण या उद्दिष्टाकडे जाण्याचा प्रयत्न शिक्षकांकडून होताना दिसून येत नाही. साठ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक संपादणूक असेल तर विद्यार्थी पुढील वर्गात जाण्यास पात्र होतो. त्यामुळे साठ टक्के संपादणूक (क्षमता प्राप्त) होईल हे उद्दिष्ट समोर ठेवून अध्यापन केले जाते. विशेषत: एकशिक्षकी वा द्विशिक्षकी शाळांवर अध्यापन करणाऱ्या शिक्षकांना वेगवेगळ्या अध्यापन पद्धतींचा सुनियोजितपणे वापर करणे जमतेच असे नाही. याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या क्षमता विकसनावर होतो. उदा. इ. १० वी मध्ये शिकत असलेला विद्यार्थी व्यासपीठावर निर्भिडपणे बोलू शकत नाही, वरिष्ठांशी बोलण्याचे धाडस होत नाही. याचे कारण भाषण-संभाषण क्षेत्रांतर्गत क्षमतांचा विकास झालेला नसतो. आणि तरीही तो पुढील वर्गात गेलेला असतो. म्हणजेच अध्यापन करत असताना या क्षमता विकासाकडे शिक्षकाने जाणीवपूर्वक लक्ष दिलेले नसते. क्षमताधिष्ठित अध्यापनामुळे मात्र पाठांतर स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, बालसभा, थोरांची जयंती, पुण्यतिथी कार्यक्रम, राष्ट्रीय दिन साजरे करणे, कथाकथन स्पर्धा, वयोगटाशी संबंधित विषय देऊन चर्चा इ. उपक्रमांचे

आयोजन काही शाळांमध्ये केले जाते. त्यामुळे भाषण-संभाषण क्षेत्रांतर्गत क्षमतांचा विकास करण्याकडे शिक्षक लक्ष देऊ लागले आहेत असे म्हणावे लागते. परंतु वर्गातील सर्वच विद्यार्थ्यांना या उपक्रमांचा लाभ मिळतो किंवा अभिव्यक्तीची संधी मिळतेच असे नाही. अध्यापन करताना स्वगत, नाट्यछटा, संवाद (नाट्यप्रवेश), निवडक उताऱ्याचे पाठांतर इ. बाबी शिक्षक वर्गात घेण्याचा प्रयत्न करतात. या क्षेत्रांतर्गत क्षमतांचा विकास बराचसा मराठी व्याकरणावर अवलंबून आहे. व्याकरण हा विद्यार्थ्यांच्या व शिक्षकांच्या दृष्टीने नीरस आणि कंटाळवाणा विषय. त्यामुळे शिक्षक क्षमता विकसनासाठी जो प्रयत्न करतात त्यावर मर्यादा येतात. मातृभाषा अध्यापन प्रक्रियेत उपयोजनाकडेही दुर्लक्ष होते. तरीही मातृभाषा अध्यापनाकडे मातृभाषा हा अध्यापनाचा विषय आहे व त्याचे महत्व अनन्यसाधारण आहे हे निश्चित.

### १.६.१ मातृभाषा : क्षमताधिष्ठित मूल्यमापनाची गरज

अभ्यासक्रमाची सर्वसाधारण उद्दिष्टे किती प्रमाणात साध्य झाली, विहित केलेल्या क्षमता विद्यार्थ्यामध्ये किती प्रमाणात विकसित झाल्या हे पडताळून पाहणे म्हणजे मूल्यमापन. थोडक्यात मूल्यमापन हा अध्ययन-अध्यापन प्रक्रियेचा अविभाज्य घटक आहे. मूल्यमापन म्हणजे केवळ लेखी परीक्षेसाठी प्रश्नपत्रिका तयार करून उत्तरपत्रिका तपासून गुण देऊन विद्यार्थ्यांना पास किंवा नापास करण्याची प्रक्रिया नसून विविध क्षमतांचे विकसन सर्व विद्यार्थ्यामध्ये झाले आहे की नाही हे विविध प्रकारे, वेळोवेळी पडताळून पाहण्याची एक प्रक्रिया आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. हा विकास अभ्यासक्रमाद्वारे नेमून दिलेल्या क्षमतांच्या आधारे घडवून आणता येतो. विद्यार्थ्यांचा विकास सुयोग्य दिशेने व अपेक्षित पातळीपर्यंत होत नसल्यास अध्ययनातील अडचणी किंवा अध्यापनातील त्रुटींचा शोध घेणे हे मूल्यमापन प्रक्रियेचे मुख्य कार्य आहे. या प्रक्रियेत खालील बाबींचा समावेश होतो

१) वर्गातील सर्व विद्यार्थ्यांची सरासरी आणि विशेषत: प्रत्येक विद्यार्थ्यांची वैयक्तिक क्षमता संपादन पातळी नियोजनबद्ध पद्धतीने शोधून काढणे.

२) विद्यार्थ्यांच्या संपादणुकीचे क्षमतानिहाय व विद्यार्थीनिहाय विश्लेषण करून काही क्षमता विद्यार्थ्यांना प्राप्त करण्याच्या दृष्टीने कठीण आहेत असे आढळून आल्यास अध्यापनात दुरुस्ती, बदल, सुधारणा करणे.

वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना आणि विशेषत: प्रत्येक विद्यार्थ्याला क्षमता प्राप्त करण्यामध्ये असलेल्या सामुहिक आणि वैयक्तिक अडचणी दूर करण्यासाठी पूनरध्यापन, स्वयंअध्ययन उपक्रम अथवा अर्थपूर्ण स्वाध्याय, सराव इ. चे आयोजन करणे.

३) मूल्यमापन हे जसे अध्ययन अध्यापनाला सुनिश्चित दिशा देते. तसेच अभ्यासक्रम अथवा पाठ्यक्रमात अपेक्षित सुधारणा करण्यासाठी सुद्धा साह्यभूत ठरते. विशिष्ट पाठ्यांश अथवा घटक हा विशिष्ट वयोगटाच्या विद्यार्थ्यांच्या आकलनाच्या दृष्टीने कठीण आहे असे आढळल्यास पूनर्रचनेच्या वेळी आवश्यक ते बदल करणे शक्य होते.

अभ्यासक्रमाची व पाठ्यक्रमाची रचना ही क्रमबद्ध आहे. अभ्यासक्रमाच्या रचनेवर पाठ्यक्रमाची रचना आधारलेली आहे. पहिला घटक विद्यार्थ्यांना समजला नाही तर पुढील घटकही चांगल्या प्रकारे समजत नाही. सर्व विद्यार्थ्यांमध्ये मातृभाषेच्या उद्दिष्टपूर्तीची खात्री करावयाची असेल तर अध्ययन अध्यापनाच्या दरम्यान मातृभाषेच्या सर्व क्षेत्रांतर्गत क्षमताप्राप्तीची पडताळणी करणे आवश्यक आहे. म्हणजेच मूल्यमापन करणे गरजेचे आहे. त्यामुळे पुढील उपाययोजना करणे शक्य होते. अध्यापनाचे वेळी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारुन, कृती करावयास सांगून विद्यार्थी वर्तनाची बारकाईने पडताळणी केली तर अध्यापन योग्य प्रकारे झाले की नाही हे समजते. तसेच विद्यार्थ्यांना एखादा घटक कितपत समजला हे अजमावता येते. म्हणजेच अध्यापनातील उणिवा, अडचणी मूल्यमापनामुळे समजतात. वेळोवेळी मूल्यमापन करणे अत्यंत आवश्यक असते. त्यामुळे उणिवा टाळून चांगल्या बाबी अधिक बळकट करता येतात. विशेषत: मूल्यमापनामुळे विद्यार्थ्यांची अध्ययनातील गती समजते.

### १.६.२ मातृभाषा : क्षमताधिष्ठित मूल्यमापनाचे स्वरूप

मूल्यमापन म्हटले की, डोळ्यासमोर येते ती परीक्षा, ती ही 'लेखी' परीक्षा. मूल्यमापनातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाच्या सर्वांगीण प्रगतीचे चित्र अपेक्षित असते. मात्र केवळ लेखी स्वरूपाच्या परीक्षेतील प्रतिसादातून असे चित्र उभे करणे शक्य नसते. कोणत्याही प्रकारच्या मूल्यमापनातून मिळणाऱ्या नोंदी वेळच्या वेळी व योग्य प्रकारे केल्या तरच विद्यार्थ्यांची प्रगती कळू शकते. अध्ययन-अध्यापन, प्रात्यक्षिके, निरीक्षणे, स्वाध्याय सराव इत्यादी विविध अध्ययन-अनुभूतीतून क्षमतांचा विकास होतो. शिक्षकाने सातत्याने नोंदी करणे आवश्यक असते तरच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वात घडून येणारा बदल मूल्यमापन प्रक्रियेने निश्चित करता येतो. हे बदल एकात्म स्वरूपाचे असतात. म्हणजेच हे मूल्यमापन सर्वंकष सातत्यपूर्ण म्हणता येते.

कालिक मूल्यमापन म्हणजे विशिष्ट कालावधीनंतर केले जाणारे मूल्यमापन. इ. १ ते ४ साठी वर्षामध्ये चार क्षमता चाचण्या घेतल्या जात होत्या. परंतु शासन पत्र क्रं. संप्रप.१०९८/१०८(२६/९८) प्रशि.५,दि.५/९/९९ अन्वये पहिल्या सत्रामध्ये दोन चाचण्या व दुसऱ्या सत्रामध्ये अंतिम वार्षिक परीक्षा क्षमताधिष्ठित अभ्यासक्रमानुसार घेतल्या जातात. त्यामध्ये दोन चाचण्यातील प्राप्त गुण + वार्षिक परीक्षेचे गुण = वार्षिक परीक्षेचा निकाल तयार केला जातो. पहिल्या दोन क्षमता चाचण्या ५० गुणांच्या (३० गुण लेखी + १० गुण तोंडी + १० गुण प्रात्यक्षिक) घेतल्या जातात. शासनाचे पत्र क्रं. संप्रप १०९८/१०८(२६/९८) प्रशि-५, दि.४/१०/९९ व दि. २९/१/२००० अन्वये पहिल्या दोन चाचण्या १०० गुणांच्या व वार्षिक परीक्षेचे १०० गुण (८० गुण लेखी परीक्षा व २० गुण तोंडी परीक्षा) अशी एकूण मराठी विषयाची २०० गुणांची परीक्षा घेतली जाते. म्हणजेच हे कालिक मूल्यमापन होय.

आकारिक मूल्यमापन - अभ्यासक्रमानुसार विहित केलेल्या क्षमतांच्या पूर्ततेचा शोध घेण्यासाठी औपचारिक वा अनौपचारिक वातावरणात मूल्यमापन केले जाते. दैनंदिन अध्यापनातून


विद्यार्थी कसा आकार घेतो, अपेक्षित क्षमतांमध्ये त्याची प्रगती होते की नाही हे पहावे लागते. यासाठी विद्यार्थ्याचे निरीक्षण करावे लागते. सातत्याने नोंदी घ्याव्या लागतात. या नोंदी विद्यार्थ्याची प्रगती दर्शविणाऱ्या असतात. तसेच त्रुटींच्या नोंदीदेखील आवश्यक ती सुधारणा होण्याच्या दृष्टीने केलेल्या असतात. प्राथमिक स्तरावर आवश्यक ती सुधारणा होण्याच्या दृष्टीने केलेल्या असतात. प्राथमिक स्तरावर क्षमताधिष्ठित मूल्यमापन करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांच्या वर्तणुकीतील बदलांचे निरीक्षण करणे गरजेचे आहे. हे निरीक्षण वर्गातील अध्ययन-अध्यापन, गटकार्य, दिलेले उपक्रम, विविध प्रसंग, घटना, परिचित, अपरिचित, लहान,समवयस्क, वडिलधाऱ्या व्यक्तींशी येणारे संबंध अशा विविध प्रसंगी संबंधित बाबींशी अनुसरून विद्यार्थ्यांनी घेतलेला सहभाग, दिलेला प्रतिसाद आणि विद्यार्थ्यांची वर्तणूक या संदर्भात करावे लागते. जाणीवपूर्वक निरीक्षण करून वर्तनबदलाच्या आवश्यक त्या नोंदी नोंदवहीत ठेवणे गरजेचे असते. निरीक्षणाद्वारे केलेले मूल्यमापन विद्यार्थ्याला पास वा नापास अगर त्याचा स्तर ठरविण्यासाठी नसते तर क्षमता प्राप्तीमधील उणिवा विद्यार्थ्याने स्वयं प्रयत्नाने दूर करण्यासाठी असते. मूल्यमापन प्रक्रियेद्वारे विद्यार्थ्यांच्या आत्मसन्मानाला धक्का पोहोचणार नाही अशा पद्धतीने मूल्यमापन प्रक्रिया घडत जाणे आवश्यक असते.

आज जर मूल्यमापनाविषयी स्थिती पाहिली तर असे दिसून येते की, शिक्षक मूल्यमापन पद्धतीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतात. कारण मूल्यमापनाची जी पद्धत स्वत:च्या दृष्टीने सोयीची व सोपी वाटेल तीच वापरण्याकडे कल दिसून येतो. विशेषत: लेखी परीक्षा घेणे सोयीचे असल्यामुळे मातृभाषा विषयाच्या तोंडी परीक्षा व प्रात्यक्षिक परीक्षांकडे दुर्लक्ष केले जाते. साहजिकच श्रवण, भाषण-संभाषण इ. चे मूल्यमापन होत नाही म्हणजेच विद्यार्थ्यांच्या भावनिक व मानसिक विकासाचे मूल्यमापन होत नाही. त्यामुळे विद्यार्थ्याच्या अंगी उपजत कौशल्ये, चांगल्या सवयी, रूची इ. बाबींची दखलच घेतली जात नाही. मूल्यमापन करत असताना लेखी परीक्षेमुळे केवळ स्मरणशक्तीचे परीक्षण होते. त्यामुळे विद्यार्थी पाठांतर करतात. पाठांतर केलेल्या बाबीचे आकलन झालेले असतेच असे नाही. इ. १ ते ४ साठी ज्या क्षमता चाचण्या घेतल्या जातात त्यामध्ये संख्यात्मक मापन केले जाते. उदा.

मातृभाषेमध्ये एखाद्या विद्यार्थ्यांला ३० पैकी २५ गुण मिळाले म्हणजे सर्व भाषिक कौशल्ये त्याला आत्मसात झाली असे म्हणता येत नाही. त्यामुळे शिक्षकाला विद्यार्थी नेमका कोणत्या भाषिक कौशल्यात अप्रगत आहे हे समजत नाही. इ. १ ते ४ साठी प्रतिसादात्मक नोंदवही आहे. दैनंदिन अध्ययन-अध्यापनाच्या वेळी अनौपचारिक मूल्यमापनातून विद्यार्थ्यांच्या त्रुटीच दाखविल्या जातात. वास्तविक झालेल्या अध्ययनाची दखल घेऊन पुढील अध्ययनाला प्रोत्साहन देणे गरजेचे असते. परंतु असे केले जात नाही. विद्यार्थ्यांना तशी संधी दिली जात नाही. पर्यायाने अध्ययनास प्रेरणा मिळत नाही. म्हणजे मूल्यमापन अशा पद्धतीने होते की, शिक्षणातला आनंदच नाहिसा होतो.

बरेचदा क्षमता चाचणीचेवेळी 'परीक्षा आहे, पास झाले पाहिजे' या भीतीने विद्यार्थी दडपणाखाली असतो. शिवाय शिक्षकांची सूचना देण्याची पद्धत अशी असते की अनेकदा विद्यार्थी काही गोष्टी आठवायला देखील विसरुन जातो. परीक्षेचे वातावरण गंभीर असे तयार केले जाते. त्यामुळे वाचलेले न आठवणे, अक्षराचे वळण बिघडणे अशा बाबी घडतात. शेवटी विद्यार्थ्याला विविध क्षेत्रातील या क्रमांकाच्या क्षमता प्राप्त झाल्या नाहीत असा निष्कर्ष काढला जातो. अप्राप्त क्षमता विकसित करण्यासाठी उपचारात्मक कार्यक्रम जाणीवपूर्वक राबविला जातोच असे नाही. काही वेळा असे आढळते की, अप्राप्त क्षमता क्रमांला वर्तुळ केले जाते. काही कालावधीनंतर म्हणजे दुसरी चाचणी होण्यापूर्वी ते वर्तुळ काढून टाकले जाते. म्हणजे किमान पातळीवर (साठ टक्के क्षमता प्राप्त) आणले जाते. म्हणजे दुसऱ्या चाचणीस बसण्यासाठी विद्यार्थ्यांची कागदोपत्री पात्र केले जाते. वर्षाभरामध्ये घेतल्या जाणाऱ्या सर्व चाचण्यामध्ये शिक्षक मूल्यमापनाची प्रक्रिया अशाच पद्धतीने म्हणजे मूल्यमापन पद्धतीने पूर्ण करतात. आणि विद्यार्थ्याला पुढील वर्गात बढती देतात. प्रतिसादात्मक नोंदी वहीमध्ये केवळ एक उपचार म्हणून केल्या जातात. त्यामध्येही सातत्य असतेच असे नाही. त्या नोंदीचा आणि विद्यार्थ्यांच्या बढतीचा तसा काहीच संबंध राहत नाही.

काही जिल्ह्यांमध्ये एकच जिल्हा परीक्षा मंडळ असते. तर काही जिल्ह्यांमध्ये तालुका परीक्षा मंडळे आहेत. या मंडळाकडून क्षमता चाचणी व सत्र परीक्षांच्या प्रश्नपत्रिका काढल्या जातात. या प्रश्नपत्रिकांचे द्‌वारे जे मूल्यमापन केले जाते ते लेखी, तोंडी व प्रात्यक्षिक स्वरूपाचे असते. लेखी परीक्षेत जर गुण किमान पातळीपेक्षा कमी मिळाले तर तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षेसाठी असलेल्या गुणांमधून कमी पडलेले गुण मिळवले जातात. वास्तविक तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षांकडे बहुतांशी शाळांमध्ये दुर्लक्ष केले जाते. ज्या शाळांमध्ये या परीक्षा घेतल्या जातात त्याकडे फारसे गांभीर्याने लक्ष दिले जात नाही. वस्तुत: प्रत्येक विद्यार्थ्यांच्या प्रगतीकडे शिक्षकाचे लक्ष असले पाहिजे. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिक्षण तज्ज्ञ डॉ. आर. एस. दवे यांनी वर्गीकरण करून प्रभुत्व पातळीचे स्वरुप स्पष्ट केले आहे.



केवळ विद्यार्थ्याला वरच्या वर्गात बढती देण्यासाठीच शिक्षक विद्यार्थ्याला प्रभुत्वाच्या जवळपास नेण्याचा प्रयत्न करतात. मूल्यमापनही त्याच पद्धतीने केले जाते. 'Enrichment Programme' शिक्षक राबविताना दिसून येत नाही.

मूल्यमापन हे सर्वंकष व सातत्यपूर्ण असते हे निश्चित अंतिम उद्दिष्ट गाठण्यासाठी उद्दिष्टाचे घटक, टप्पे, उपलब्ध वेळ लक्षात घ्यावा लागतो. शिक्षकांची अशी तक्रार असते की, मूल्यमापन करत असताना लेखी परीक्षा घेण्यातच वेळ जातो. तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षा घ्यावयाच्या म्हटले तर वेळ अपुरा पडतो. या दोन्ही प्रकारच्या परीक्षा वैयक्तिक घ्याव्या लागतात. त्यामुळे जी प्रश्नपत्रिका काढली जाते तिला समांतर असे प्रश्न शिक्षकांनी काढलेले नसतात. परीक्षा संपविणे एवढेच ध्येय पुढे असते त्यामुळे ज्या शाळेत तोंडी परीक्षा घेतली जाते तेथेही मूल्यमापन योग्य पद्धतीने होत नाही. विद्यार्थ्यांना जे प्रश्न विचारले जातात त्याची पुनरावृत्ती होत असते. त्यासाठी विद्यार्थ्याला मिळालेल्या गुणांच्या कच्च्या नोंदीही कुठे घेतलेल्या दिसून येत नाहीत. म्हणजेच मातृभाषेच्या श्रवण व भाषण क्षेत्राची मूल्यमापन अंदाजे केल्याचे दिसते. वास्तविक मानवी जीवनाची यशस्विता भाषण क्षमतेवर अवलंबून आहे. औपचारिक-अनौपचारिक बोलणे कसे असावे, स्नेह्यांशी, वरिष्ठांशी, मुलाखतीचे वेळी, व्यासपीठावर, वादविवाद स्पर्धेच्या वेळी कसे बोलावे हे या क्षमतेचा पूर्ण विकास झाला तरच समजू शकते. परंतु ही क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित झाली की नाही हे मूल्यमापनाशिवाय समजू शकत नाही. भाषण क्षमतेच्या मूल्यमापनाबाबत असे दिसून येते की एकाच वर्गातील काही विद्यार्थी धीट असतात. ते खूप बोलतात. काही अबोल असतात. काही प्रश्नांची उत्तरे चांगली देतात, तर काही मुद्देसूद बोलतात. मूल्यमापन करताना या सर्वांना एकाच पद्दीत मोजले जाते. याचे कारण म्हणजे भाषण क्षेत्रांतर्गत क्षमतांच्या मूल्यमापनाची दिशा शिक्षकाला समजलेली नसते.

## १.७ संशोधनाची गरज

भाषण क्षेत्रातील विविध क्षमतांचा विकास होण्यासाठी प्राथमिक शाळांमध्ये विविध उपक्रम राबविले जातात. या क्षमतांचा विकास कितपत झाला हे अजमावण्यासाठी मूल्यमापन होणे गरजेचे

असते. परंतु अचूक मूल्यमापन होण्यासाठी मूल्यमापनाची विश्वसनीय व अचूक अशी मूल्यमापन पद्धती उपलब्ध नाही. किंबहुना त्यासाठी मूल्यमापनाची साधनेही उपलब्ध नाहीत आणि ती तयार करण्यासाठी फारसे श्रमही घेतले जात नाहीत. भाषण क्षेत्रांतर्गत क्षमतेच्या बाबतीत मूल्यमापन संदर्भात एकाच इयत्तेचा विचार केला तर प्रत्येक शाळानिहाय मूल्यमापन साधनांचे स्वरूप भिन्न असल्याचे दिसून येते. ही बाब टाळण्यासाठी एकाच इयत्तेसाठी म्हणजे इयत्ता चौथीसाठी सर्व शाळांमध्ये विश्वसनीय व अचूक अशी एकच मूल्यमापन पद्धती असावी. तसेच स्वत:च्या वर्गातील विद्यार्थ्यांचे भाषण क्षेत्राचे मूल्यमापन योग्य पद्धतीने व्हावे, विद्यार्थ्यांची प्रगती शिक्षकाला समजावी, मातृभाषेतील भाषण क्षेत्राचे मूल्यमापन करताना शिक्षकाचे लॉगबुक भरुन, मुख्याध्यापकांना मार्गदर्शन करता यावे. तसेच या क्षेत्रांतर्गत क्षमता विकास करण्यामध्ये शिक्षकांनी किती प्रयत्न केले हे अधिकाऱ्यांना समजावे आणि मुख्य म्हणजे वाचन व लेखन क्षेत्राचे मूल्यमापन होते हे विद्यार्थ्यांना माहीत असते परंतु आपण जे बोलतो, ज्या पद्धतीने बोलतो, त्याचीही परीक्षा आपले शिक्षक घेतात याची विद्यार्थ्यांला जाणीव होऊन त्याचा आत्मविश्वास वाढावा यादृष्टीने भाषण क्षेत्रांतर्गत क्षमतांच्या मूल्यमापनासाठी मूल्यमापनाची साधने तयार करण्याचा संशोधिकेचा प्रयत्न आहे.

## १.८ समस्या विधान

''इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी भाषण क्षमता मापन साधनांचा विकास.''

## १.९ समस्या कथन

भाषण क्षेत्रांतर्गत क्षमतांचे इयत्ता चौथीच्या वर्गासाठी मातृभाषा विषयाचे मूल्यमापन केले जाते का ? मूल्यमापनातील अडचणी कोणत्या ? मूल्यमापन करण्यासाठी कोणती मूल्यमापन साधने वापरली जातात ? इयत्ता चौथीच्या अभ्यासक्रमामधील भाषण क्षेत्रांतर्गत क्षमता पुरेशा आहेत का ? त्याअंतर्गत अन्य क्षमतांची आवश्यकता आहे का ? या क्षमतांचे यथार्थ मूल्यमापन कसे करावयाचे ? त्यासाठी मूल्यमापन साधन तयार करता येईल का ? ते कसे तयार करावयाचे ? याविषयीची माहिती संकलित करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## १.१० संशोधनाची उद्दिष्टे

१) भाषण क्षेत्रांतर्गत क्षमतांच्या प्रचलित मूल्यमापन पद्धतींचा शोध घेणे.

२) भाषण क्षेत्रातील क्षमतांचे मूल्यमापन करण्यातील शिक्षकांना येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.

३) भाषण क्षेत्रांतर्गत अन्य क्षमता निश्चित करणे.

४) भाषण क्षेत्रांतर्गत क्षमतांचे उपक्षमतांमध्ये विभाजन करणे.

५) विविध क्षमतावर आधारित पडताळा सूची तयार करणे.

६) पडताळा सूचीचा प्रत्यक्ष वापर करून क्षमतांचे मूल्यमापन करणे.

## १.११ गृहिते

१) पहिली ते पाचवीचा अभ्यासक्रम क्षमताधिष्ठित झालेला आहे.

२) विविध उपक्रमातून क्षमता विकसित केल्या जातात.

३) क्षमता संपादित असल्याने त्यांचा विकास करता येतो.

४) व्यक्तीपरत्वे क्षमता भिन्न असते.

५) या क्षमतांचे मूल्यमापन करता येते.

६) क्षमता विचारात घेऊन मूल्यमापन साधने विकसित करता येतात.

## १.१२ परिकल्पना

१) भाषण क्षेत्रांतर्गत क्षमतांचे मूल्यमापन करताना शिक्षकांना अडचणी येतात.

२) भाषण क्षेत्रांतर्गत अन्य क्षमता निश्चित करता येतात.

३) या क्षेत्रांतर्गत क्षमतांचे उपक्षमतांमध्ये विभाजन करता येते.

४) या क्षेत्रांतर्गत क्षमतांवर आधारित पडताळा सूची तयार करता येते.

५) पडताळा सूचीच्या सहाय्याने भाषण क्षमतेचे मूल्यमापन करता येते.

## १.१३ संज्ञांचे स्पष्टीकरण

१) **प्राथमिक शाळा** - ग्रामीण व शहरी विभागात इयत्ता १ ते ४ / १ ते ७ पर्यंतचा अभ्यासक्रम शिकविण्यात येणाऱ्या अनुदानित / विना अनुदानित शाळा.

२) **भाषण क्षेत्र** - प्रत्येक विषयातील क्षमतांचे आशयानुसार जे गट पाडलेले असतात त्यातील प्रत्येक गटाला क्षेत्र म्हटले आहे. भाषा विषयासाठी असलेल्या नऊ क्षेत्रांपैकी व्यक्तीची स्वत:ची विचाराची अभिव्यक्ती म्हणजे भाषण क्षेत्र होय.

३) **क्षमता** - प्रत्येक व्यक्तीमध्ये उपजत गुण व सुप्त शक्तींचे उपयोगितेत होणारे रूपांतर म्हणजे क्षमता होय.

४) **साधने** - भाषण क्षेत्रांतर्गत क्षमतांचे मूल्यमापन करण्यासाठी संशोधकाने विद्यार्थ्यांसाठी विकसित केलेल्या चाचण्या.

## १.१४ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

१) **क्षेत्र** - हे संशोधन करण्यासाठी सातारा तालुक्यातील १८३ शाळांपैकी ८% शाळा निवडलेल्या आहेत.

२) **जनसंख्या** - या संशोधनासाठी इयत्ता ४ थीतील ३५० विद्यार्थ्यांचा समावेश केलेला आहे.

३) या संशोधनासाठी इयत्ता ४ थीला अध्यापन करणाऱ्या १५ प्राथमिक शिक्षकांचा समावेश केलेला आहे.

४) यामध्ये मराठी विषय शिकविणारे सातारा तालुक्यातील ७ तज्ज्ञ व ३ क्षेत्रीय अधिकारी यांची निवड केलेली आहे.

५) **विषय** - सदर संशोधनासाठी मराठी विषय निवडला असून त्यातील भाषण हे क्षेत्र निवडले आहे.

६) **निष्कर्ष** - प्रातिनिधिक स्वरूपाच्या निवडलेल्या शाळांप्रमाणे परिस्थिती अस्तित्वांत असेल त्या शाळांना निष्कर्ष उपयुक्त ठरतील.

**प्रकरण योजना**

सदर संशोधन प्रकल्पाचे लेखन एकूण पाच प्रकरणामध्ये केलेले आहे.

प्रकरण १ - संशोधनाची पार्श्वभूमी, संशोधन विषयाचे महत्व, संशोधनाची उद्दिष्टे, गृहितके.

प्रकरण २ - या विषयाशी संबंधित आजवर झालेल्या संशोधन कार्याचा आढावा घेतला आहे.

प्रकरण ३ - या संशोधनासाठी निवडलेल्या पद्धतीचे वर्णन व एकूण कार्यपद्धतीचे स्वरूप विशद केले आहे.

प्रकरण ४ - माहितीचे संकलन व प्रक्रियाकरण करून निष्कर्ष दिले आहेत.

प्रकरण ५ - संशोधन अहवालाचा सारांश आणि सामान्य निष्कर्ष व शिफारशी सुचविलेल्या आहेत.